# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 April 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक ११ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- निवडणूक साहित्यावर मुद्रक आणि प्रकाशकाची माहिती सुस्पष्ट छापण्याची निवडणूक आयोगाची सूचना
- निवडणुकीच्या प्रचाराला वेग, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रामटेक इथं सभा तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज नांदेड जिल्ह्यात नरसी इथं सभेला संबोधित करणार
- साठवणूकदारांकडच्या सर्व डाळींचे साप्ताहिक साठे जाहीर करणं तसंच ही माहिती प्रमाणित करण्याचे केंद्र सरकारचे निर्देश
- ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईदचा सर्वत्र उत्साह

आणि

- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून मतदान जागृतीसाठी विविध उपक्रम

****

निवडणूक साहित्यावर मुद्रक आणि प्रकाशकाची माहिती सुस्पष्ट रुपात छापण्याची सूचना, केंद्रीय निवडणूक आयोगानं केली आहे. निवडणूक प्रचारातल्या जबाबदारीसंदर्भात पारदर्शकता येण्याच्या दृष्टीनं तसंच प्रचार खर्चाच्या एकूण हिशेबासाठी ही बाब आवश्यक असल्याचं, आयोगानं म्हटलं आहे. मुद्रक तसंच प्रकाशकाच्या नाव आणि पत्त्याविना प्रचार साहित्य छापण्यास तसंच प्रसिद्ध करण्यास मनाई करण्यात आली आहे.

****

निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान अवघ्या आठवडाभरावर आलं आहे. त्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी प्रचाराला वेग दिला आहे. विविध पक्षांचे स्टार प्रचारक आपापल्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा घेत आहेत.

भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नागपूर जिल्ह्यातल्या रामटेक इथं प्रचार सभा घेतली. येत्या निवडणुकीतलं मतदान हे फक्त एक खासदार निवडण्यासाठी नसून, तर देशाच्या विकासाचा पाया बळकट करण्यासाठीचं मतदान असेल, असं ते म्हणाले. राज्यघटनेबाबतचे सर्व अपप्रचार निराधार असल्याचं सांगत, आपल्या सरकारनेच `आसेतुहिमाचल` राज्यघटना लागू केल्याचं, मोदी यांनी नमूद केलं.

बसपा प्रमुख मायावती यांची आज आपल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी नागपुरात दुपारी तीन वाजता जाहीर सभा होणार आहे.

****

नांदेडचे महायुतीचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ, भाजपचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची महाराष्ट्रातली पहिली सभा आज नांदेडमध्ये होणार आहे. नायगाव तालुक्यातल्या नरसी इथं दुपारी तीन वाजता ही सभा होणार असल्याची माहिती, सभेचे समन्वयक विश्वास पाठक यांनी दिली.

****

यंदाची लोकसभा निवडणूक ही दोन विचार प्रवाहांमधली लढाई असल्याचं मत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी व्यक्त केलं. काल सामाजिक संपर्क माध्यमावरच्या एका संदेशात बोलताना गांधी यांनी, एका बाजूला काँग्रेसनं भारताला नेहमीच एकसंध ठेवलं तर दुसऱ्या बाजूकडून कायम विभाजन केलं गेल्याचा आरोप केला.

****

लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तसंच काँग्रेस पक्षानं काल प्रत्येकी दोन उमेदवारांची घोषणा केली. राष्ट्रवादीने सातारा इथून शशिकांत शिंदे यांना, तर रावेर इथून श्रीराम पाटील यांना उमेदवारी दिली आहे. तर काँग्रेसनं धुळ्याहून शोभा बच्छाव आणि जालन्याहून डॉ कल्याण काळे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. भारतीय जनता पक्षानंही चंदीगढ, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल मधल्या नऊ उमेदवारांची दहावी यादी काल जाहीर केली.

****

महाविकास आघाडीनं सांगलीच्या उमेदवारीबाबत फेरविचार करावा, असं आमदार विश्वजीत कदम यांनी म्हटलं आहे. ते काल पलूस इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. सांगलीची जागा काँग्रेसला मिळायला हवी, असा या सर्वांचा आग्रह आहे, मात्र ही जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मिळाल्याचं ते म्हणाले.

****

रामटेक मतदार संघातून काँग्रेसतर्फे अर्ज भरणाऱ्या रश्मी बर्वे यांची याचिका सर्वोच्च न्यायालयानं काल फेटाळून लावली. जात प्रमाणपत्राच्या मुद्दयावरून बर्वे यांचा उमेदवारी अर्ज छाननीत बाद झाला होता, त्याविरोधात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली, मात्र त्यांची याचिका खंडपीठानं फेटाळली होती, खंडपीठाच्या निर्णयाला आव्हान देणारी त्यांची याचिका सर्वोच्च न्यायालयानंही फेटाळून लावली.

****

मतदानासाठी मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे पुरावे ग्राह्य धरले जातात, या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, बँक पासबुक, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, आपापल्या आस्थापनेचं छायाचित्रसह ओळखपत्र, पारपत्र, आदी पुराव्यांचा समावेश आहे. याशिवाय सर्व मतदारांना मतदानाच्या किमान पाच दिवस आधी माहितीच्या चिठ्ठ्यांचं निवडणूक कार्यालयाकडून वितरण केलं जातं. मतदारांनी मतदानासाठी जाताना, छायाचित्रासह ओळखपत्र आणि माहितीची चिठ्ठी सोबत ठेवण्याचं आवाहन, निवडणूक अधिकारी कार्यालयानं केलं आहे.

****

साठवणूकदारांकडच्या सर्व डाळींचे साप्ताहिक साठे जाहीर करणं तसंच ही माहिती प्रमाणित करण्याचे निर्देश केंद्र सरकारने सर्व राज्य तसंच केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. याबाबतची माहिती संबंधित संकेतस्थळावर अद्ययावत करणं आवश्यक असून, चुकीची माहिती देणाऱ्या साठवणूकदारांविरोधात कठोर कारवाईचा इशाराही केंद्रानं दिला आहे. साठेबाजी तसंच बाजारपेठेतली हेराफेरी रोखण्यासाठी, तूर, उडीद, चणा, मसूर आणि मूग या पाच प्रमुख डाळींसह पिवळ्या वाटाणा डाळीच्या साठ्यांवरही नियंत्रण ठेवण्याची सूचना, केंद्र शासनानं केली आहे.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षेतल्या पोलीस उप निरीक्षक संवर्गासाठीची

सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. उमेदवारांच्या अर्जामधल्या विविध दाव्यांच्या अनुषंगानं अंतिम निकालापूर्वी यात बदल होऊ शकतो असं आयोगानं कळवलं आहे.

दरम्यान, पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या मुख्य परीक्षा – २०२२ अंतर्गत शारीरिक चाचणीचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. ही चाचणी १५ एप्रिल ते दोन मे २०२४ या कालावधीत होणार होती.

****

ईद–उल–फित्र, अर्थात रमजान ईद आज साजरी होत आहे. तीस दिवसांचे रोजे अर्थात निर्जळी उपवासानंतर आजचा दिवस साजरा केला जातो. या निमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. ही ईद सर्वांच्या जीवनात आनंद, उत्तम आरोग्य आणि संपन्नता घेऊन येवो असं राज्यपालांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, ईदच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांमधून नागरिकांनी काल गर्दी केल्याचं दिसून आलं. कपडे, आभुषणं, गृहसजावटीचं साहित्य तसंच सुक्या मेव्याच्या खरेदीकडे नागरिकांचा अधिक कल दिसून येत आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं ईदची मुख्य नमाज छावणी ईदगाह मैदानावर सकाळी नऊ वाजता होणार आहे.

****

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. या निमित्तानं काल छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या वतीनं, महात्मा ज्योतिबा फुले यांचं समाजकार्य आणि भारतीय राज्य घटनेतील प्रशासन, या विषयांवर व्याख्यान झालं. छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सिटीचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र जोगदंड यांनी या व्याख्यानमालेत पहिलं पुष्प गुंफलं.

****

लातूर जिल्ह्याच्या देवणी इथं सकल मराठा समाजातर्फे आयोजित संवाद बैठकीत मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी काल मार्गदर्शन केलं. सरसकट मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण द्यावं अन्यथा येत्या आठ जून पासून नारायण गडावर पुन्हा एकदा मोठं आंदोलन सुरू करण्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला.

****

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेकडून मतदान जागृतीसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. याअंतर्गत मनपा प्रियदर्शनी विद्यालयातून जनजागृती फेरी काढण्यात आली, सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांनी या फेरीमध्ये सहभाग घेऊन मतदान करण्याचा संदेश दिला. या शाळेत घेण्यात आलेल्या पालक मेळाव्यात उस्मानपुरा शाळेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून प्रत्येकाने मतदान करण्याचं आवाहन केलं.

हर्सुल इथल्या केंद्रीय प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयातल्या विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढून, "मतदारा जागा हो" या पथनाट्याचं सादरीकरण केलं.

****

लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगानं निवडणूक आयोगाचे विशेष निरीक्षक धर्मेंद्र एस. गंगवार आणि एन.के. मिश्र यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं निवडणूकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला.

दरम्यान, पेड न्यूज हा अत्यंत संवेदनशील विषय असून, मीडिया सेंटर आणि माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समितीनं याविषयावर बारकाईने लक्ष द्यावं, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

****

परभणी लोकसभा निवडणुकीचे मुख्य निवडणूक निरीक्षक, कृष्णकुमार निराला यांनी काल परभणी लोकसभा मतदार संघात, सूक्ष्म निरीक्षक तसंच केंद्र अध्यक्ष यांची आढावा बैठक घेतली. यात संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर येणाऱ्या अडचणी आणि समस्यांचं निराकरण करण्यासाठी प्रशिक्षणही देण्यात आलं.

****

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात काल मतदान यंत्र आणि इतर साहित्याची सरमिसळ करण्यात आली. या प्रथमस्तरीय सरमिसळीनंतर दोन हजार ८२४ बॅलेट युनिट, दोन हजार ८२४ कंट्रोल युनिट आणि तीन हजार एकोणसाठ व्हीव्हीपॅट यंत्रांचं विधानसभा मतदारसंघांना काल वाटप करण्यात आलं.

****